क्रमांक: १४७१०/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: २३ ऑक्टोबर, २०२०.

**संदर्भ :-** माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा शासन निर्णय क्र.GAD-मातंसं 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) दिनांक २० मार्च, २०१८

**:: <u>ज्ञापन</u> ::**

महाराष्ट्र विधीमंडळाच्या ग्रंथालय कक्षात छापील स्वरुपात उपलब्ध असलेल्या दोन्ही सभागृहांच्या कार्यवृत्तांचे डिजिटलायझेशन ग्रंथालय कक्षामार्फत करण्यात येणार आहे. ग्रंथालय कक्षात उपलब्ध असलेल्या कार्यवृत्तांचे डिजिटलायझेशन करण्यासाठी एक अद्ययावत आज्ञावलीवर आधारित प्रणाली विकसित करुन ती ग्रंथालय कक्षात कार्यान्वित करण्याची बाब प्रस्तावित आहे.

प्रस्तावित प्रणाली विकसित करण्याची आवश्यकता, त्याचे फायदे व अवाका इत्यादी माहितीचा समावेश असलेल्या आज्ञावलीबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्या प्रस्तावावर संदर्भाधिन शासन निर्णयानुसार सल्लागाराची नियुक्ती करावी जेणेकरुन अशाप्रकारच्या आज्ञावलीचा सखोल अभ्यास करुन योग्य किंमतीत व्यवहारिक निर्णय घेण्यास मार्गदर्शन होईल, असे त्यांनी सूचविले आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालय (DIT) संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या विविध विभागांमधील ई-प्रशासन कार्यक्रम व IT Projects अधिक प्रभावीपणे व सक्षमपणे राबविण्यात यावे यासाठी नामांकित, विश्वासार्ह व अनुभवी सल्लागार संस्था व कंपनीची सेवा घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शासनाच्या उच्चाधिकार समितीने निविदाप्रक्रियेद्वारे दिनांक २० मार्च, २०१८ ते १९ मार्च, २०२३ अशा पाच वर्षाच्या कालावधीसाठी खाली नमूद केलेल्या कंपनी/संस्था यांची निवड केली आहे. शासनाचे कोणतेही विभाग व संलग्न विभाग, संस्था, मंडळ इत्यादी कार्यालये या सल्लागार संस्थेच्या सेवा घेऊ शकतात.

1) M/s Deloitte
2) M/s Ernst & Young
3) M/s Grant Thornton

..२/-

4) M/s KPMG

5) M/s PWC

6) M/s Wipro

सल्लागार संस्थेची निवड कशाप्रकारे करण्यात यावी. याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केलेले आहे.

१) प्रथम शासनाच्या संबंधित विभागाने त्यांना अपेक्षित असलेल्या माहिती तंत्रज्ञान व ई-प्रशासनाशी निगडित कामाची सविस्तर माहिती व व्याप्ती (Scope of Work) D.I.T. सोबत चर्चा करुन निश्चित करावी.

२) तद्नंतर विभागाने कामाची माहिती (Scope of Work) शासनाने नेमून दिलेल्या सहा सल्लागारांना वितरित करावी. सल्लागाराने प्रस्तावित कामाबद्दल सविस्तर सादरीकरण तसेच या कामासाठी नेमण्यात येणाऱ्या तज्ञ व्यक्तींची माहिती शासन निर्णयाच्या परिशिष्ट-३ मध्ये देण्यात आलेल्या प्रमाणे सोबत जोडावी. विभागाने प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) (PIC) स्थापन करावी, समिती या कामावर देखरेख ठेवेल व योग्य तो निर्णय घेईल.

३) सर्व सल्लागारांनी त्यांच्या सादरीकरणात स्पष्टपणे हे नमूद करावे की ते सदर काम कशाप्रकारे करणार आहेत व त्यांची कार्यपध्दती कशी राहील.

४) सल्लागारांच्या सादरीकरण, कामाबद्दल त्यांचा अभ्यास व समज व त्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या तज्ञ यांचा अनुभव इत्यादी सर्व बाबींचा सखोल विचार करुन PIC त्यांच्या कामाच्या गरजेनुसार एखाद्या सल्लागाराची निवड करु शकते.

५) सल्लागारांनी नेमके काय काम करणे अपेक्षित आहे यांची सविस्तर माहिती शासन निर्णयाच्या परिशिष्ट-२ मध्ये देण्यात आली आहे.

६) निवडण्यात आलेल्या सल्लागार संस्थेनी शासन निर्णयाच्या परिशिष्ट-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मनुष्यबळ पुरवावे अन्यथा त्यांना परिशिष्ट-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

७) निवड करण्यात आलेल्या सल्लागार संस्थेच्या जबाबदारीची सविस्तर माहिती या शासन निर्णयात देण्यात आली आहे.

..३/-

महाराष्ट्र विधीमंडळाच्या ग्रंथालय कक्षात उपलब्ध असलेल्या कार्यवृत्तांचे डिजिटलायझेशन करण्याकरीता कामावर देखरेख ठेवणे व योग्य तो निर्णय घेण्यासाठी उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये या सचिवालयातील खालील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) (PIC) गठीत करण्यात येत आहे :-

१) मा.सचिव

२) उप सचिव (संगणक कक्ष)

३) उप सचिव (आस्थापना कक्ष)

४) ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी (अ.का.)

५) उप ग्रंथपाल (ग्रंथालय व माहिती)

६) पध्दती विश्लेषक

७) तांत्रिक सहायक

सदर समितीने कार्यवृत्तांच्या डिजिटलायझेशनबाबत नेमके काय काम करणे अपेक्षित आहे व त्याचा अवाका कसा असेल याबाबत सविस्तर चर्चा करुन कामाची रुपरेखा आखावी व Directorate of Information Technology (D.I.T) शी सल्ला मसलत करुन त्याला अंतिम स्वरुप दयावे. कामाची रुपरेखा ठरल्यानंतर संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केलेल्या रितीने पुढील कार्यवाही करावी.

(राजेन्द्र ग. भागवत)
सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) "क-२" (संगणक कक्ष) (वेबसाईट अपडेट करण्याकरिता) ..४/-

\\Misc१०१\d\E drive\२०२०\liabrary (PIC)\Circular.doc